महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१५ ( महाराष्ट्र अधिनियम क्र.३१ ) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ गृह विभाग, मंत्रालय (खुद) कार्यालयाच्या अधिनस्त कार्यासनामार्फत तसेच, पोलीस आयुक्त कार्यालये, पोलीस अधीक्षक कार्यालये व त्यांच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयामार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या खालील परिशिष्टातील रकाना क्र.(२) येथील लोकसेवांबाबत नियत कालमर्यादा पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी या बाबीचा, परिशिष्टातील रकाना क्र.(३),(४),(५) व (६) नुसार तपशिल अधिसुचित करीत आहे.

परिशिष्ट

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (कार्यालयीन कामकाजाचे दिवस) | पदनिर्देशित अधिका—याचे पदनाम | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (एफ.आय.आर.) प्रत पुरविणे | नोंदणीनंतर तात्काळ | पोलीस ठाणे अंमलदार | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी |
| २ | ध्वनिक्षेपकाचा (लाऊडस्पीकर) परवाना | कार्यालयीन कामकाजाचे ३ दिवस | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी | अपर पोलीस अधीक्षक |
| ३ | मनोरंजनाचे कार्यक्रमांना नाहरकत परवाना देणे | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | कार्यालयीन अधीक्षक / पोलीस निरीक्षक, प्रशासकीय अधिकारी | पोलीस उप—अधीक्षक (मुख्यालय) | पोलीस अधीक्षक |
| ४ | सभा, संमेलन, मिरवणूक, शोभायात्रा इ. करीता परवानगी देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | पोलीस ठाणे अधिकारी / उपविभागीय पोलीस अधिकारी / पोलीस उप—अधीक्षक (मुख्यालय) | उपविभागीय पोलीस अधिकारी / अतिरिक्त पोलीस अधीक्षक | पोलीस अधीक्षक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | निमशासकीय, खाजगी संस्था इ. मध्ये नोकरीकरीता वर्तणुक व चारित्र पडताळणी प्रमाणपत्र | कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उप–अधीक्षक मुख्यालय | पोलीस अधीक्षक |
| ६ | शस्त्र परवान्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र | कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | उपविभागीय पोलीस अधिकारी | पोलीस अधीक्षक |
| ७ | भारतीय नागरिकांना परदेशात जाण्यासाठी पोलीस अनुमती प्रमाणपत्र शिक्षणासाठी / नोकरीसाठी प्रवेशपत्र (व्हीसा) | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उप–अधीक्षक मुख्यालय | पोलीस अधीक्षक |
| ८ | तिबेटीयन नागरीकांना भारत देशात परत येण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र | कार्यालयीन कामकाजाचे १५ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उप–अधीक्षक मुख्यालय | पोलीस अधीक्षक |